अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | शनिवार, दि.३० डिसेंबर २०२३ | वर्ष : २२ वे | अंक : ८१ वा | किंमत : ५ रुपये | पाने ८


## बलात्कार केल्याप्रकरणी क्रिकेटपटू संदीप लामिछानेला ठरवले दोषी

नवी दिल्ली : नेपाळ संघाचा स्टार क्रिकेटर संदीप लामिछानेचे क्रिकेट करिअर धोक्यात आले आहे. नेपाळन्यायालयाने संदीप लामिछानेला अल्पवयीन मुलीवर बलात्कार केल्याप्रकरणी दोषी ठरवले आहे.

त्यामुळे संदीपचे क्रिकेट करिअरही आता धोक्यात आले आहे. एका १७ वर्षीय तरुणीने तिला हॉटेलच्या खोलीत नेले आणि तिच्यावर बलात्कार केल्याचा आरोप संदीपवर केला होता. त्यानंतर आज अल्पवयीन मुलीवर बलात्कार केल्याप्रकरणी नेपाळ न्यायालयाने संदीप लामिछानेला दोषी ठरवले आहे.



सदर प्रकरणी संदीपला यापूर्वीच अटक करण्यात आली आहे. न्यायालयाने त्याची सुनावणीआधी कोठडीत रवानगीही केली होती. मात्र, २० लाखांच्या जामीनावर संदीपची सुटका करण्यात आली. बिग बॅश लीग आणि आयपीएलमध्ये खेळलेल्या संदीपला परदेशी लीगमध्ये भाग घेण्यासही न्यायालयाने बंदी घातली होती. संदीप लामिछानेची जामिनावर सुटका झाल्यानंतर त्याने देशाच्यावतीने अनेक स्पर्धांमध्ये भागही घेतला होता. संदीपच्या शिक्षेबाबत न्यायालयाने अद्याप निर्णय घेतलेला नाही. संदीपच्या शिक्षेबाबत पुढील सुनावणीत निर्णय घेतला जाईल, न्यायालयाने म्हटले आहे.

# सेनापतींनीच दांडी मारली; मावळ्यांनी खिंड लढवली

## प्रजासत्ताक दिनापर्यंत वाट पाहू, अन्यथा सरकारच उलथवून टाकू

### धनगर समाजाचा इशारा

सुराज्य/पंढरपूर

**पंढरपूर येथे शुक्रवारी धनगर समाजाची राज्यव्यापी बैठक झाली. समाजातील दिग्गज नेत्यांनाही आमंत्रित करण्यात आले होते. मात्र, आमदार गोपीचंद पडळकर, नगरचे राम शिंदे, महादेव जानकर, माजी मंत्री दत्तात्रय भरणे या दिग्गज नेत्यांनी बैठकीला दांडी मारली. त्यामुळे मावळ्यांनाच खिंड लढवावी लागली. ज्यांच्याकडून अपेक्षा होती, त्याच नेत्यांनी पाठ फिरवल्यामुळे समाजातील स्थानिक नेत्यांचा हिरमोड झाला.येत्या प्रजासत्ताक दिनापर्यंत धनगर समाजाला एसटीचे आरक्षण न दिल्यास महायुतीचे सरकार उलथवून टाकू, असा इशारा या बैठकीत देण्यात आला.**



पंढरपूरच्या श्री पॅलेसमध्ये ही बैठक झाली. लोकसंख्येच्या दृष्टीने मराठा समाजानंतर धनगर समाज हा राज्यातील सर्वात मोठा समाज आहे. लोकसभा निवडणुकीत किमान १० ते १२ मतदारसंघात धनगर समाजाची निर्णायक मते आहेत. त्यामुळे धनगर समाजाने आरपारच्या लढाईसाठी ही राज्यव्यापी निर्णायक बैठक बोलावली होती.

देश स्वतंत्र होवून ७५ वर्ष उलटून गेली मात्र डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी घटनेत दिलेल्या एस टी आरक्षणाची अंमलबजावणी सर्वच पक्षाच्या सरकारने केली नाही. त्यामुळे येणाऱ्या २६ जानेवारीपर्यंत राज्य सरकारने अंमलबजावणी न केल्यास येणाऱ्या निवडणुकीत सरकार उलथवून टाकू असा इशारा सकल धनगर समाजाने दिला आहे. यामध्ये २६ जानेवारी पर्यंत सरकारने धनगरांच्या हातात एसटीचे दाखले दिले पाहिजेत अशी मागणी केली. तर २० जानेवारी रोजी दुसरी राज्यव्यापी बैठक होणार असून या मधल्या काळात राज्यातील सर्व तालुका, जिल्ह्यात विविध आंदोलने केली जातील. अभी नाही तो कभी नाही अशा भूमिकेने आज राज्यभरातील धनगर नेत्यांनी निर्णायक बैठक बोलावली होती. या बैठकीत गेल्या ७५ वर्षात झाला नाही असा निर्णय घेतला जाणार असल्याचे नेत्याने सांगितले. एका बाजूला मराठा समाजाचा लढा अंतिम टप्प्यात आला असताना शासन त्यांच्यासाठी काहीही करायच्या तयारीत आहे. मात्र धनगर समाजाचा वापर केवळ सत्तेसाठी आजवर सर्वच पक्षांनी करून घेतल्याचे या नेत्यांनी सांगितले. महाराष्ट्राचा सात बारा हा जणू काही त्यांच्याच समाजाच्या नावावर केल्यासारखे सत्ताधारी वागत असल्याच्या संतप्त प्रतिक्रियाही काही धनगर नेत्यांनी दिल्या.

### रोष व्यक्त झाला

धनगर समाज आरक्षण मागणीसाठी समाजातील सर्व पक्षाचे आजी माजी आमदार, खासदार आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या पदाधिकाऱ्यांना बोलविण्यात आले होते. पण बैठकीला आ.दत्ता भरणे,आ.महादेव जानकर,आ. गोपीचंद पडळकर, आ.राम शिंदे, राज्य सभेचे खासदार डॉ. विकास महात्मे यांनी दांडी मारली. त्यामुळे त्यांच्या विरोधात नाराजी व्यक्त केली गेली. राज्यात सर्वाच मतदारसंघात लोकसंख्येच्या दृष्टीने दोन नंबरवर असणारा धनगर समाज हा मोठा समाज आहे. लोकसभा निवडणुकीत किमान १२ ते १५ मतदारसंघात धनगर समाजाची निर्णायक मते आहेत. त्यामुळे धनगर समाजाने आरपारच्या लढाईसाठी ही राज्यव्यापी निर्णायक बैठक बोलावली होती. प्रमुख नेते बैठकीत उपस्थित नसल्याने त्यांच्या विरोधात रोष व्यक्त केला गेला.

### अनेक राज्यात धनगर समाजाला आरक्षण

राज्यातील धनगर समाज गेल्या अनेक वर्षांपासून अनुसूचित जमाती आरक्षणासाठी लढा देत आहे. सध्या राज्यातील धनगर समाजाला ओबीसीचे राजकीय आरक्षण आहे. मात्र, देशातील अनेक राज्यात धनगर समाजाला एसटीचे आरक्षण आहे. त्यामुळे इतर राज्याप्रमाणे महाराष्ट्रातील धनगर समाजाला देखील अनुसूचित जमातीचे म्हणजेच एसटीचे आरक्षण अंमलबजावणी करण्याची मागणी होत आहे.



### राजकीय पक्षांना इशारा

जर धनगर समाजाला अनुसूचित जमातीचे आरक्षण सुरु झाल्यास याचा फायदा सर्व ओबीसी समाजाला मिळणार आहे. ओबीसीमध्ये सर्वात मोठा समाज असलेला धनगर यातून बाजूला गेल्यास इतर ओबीसी जातींना याचा लाभ मिळेल, असा दावाही धनगर नेत्यांनी केला. या बैठकीचा फटका २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत सर्वच राजकीय पक्षांना बसेल, असा इशारा दिला.

### संघर्ष चिघळणार

मुंबईत २० जानेवारीला मनोज जरांगे यांच्या नेतृत्वात मराठा समाजाच्या आंदोलनाची हाक देण्यात आलेली आहे. तर दुसरीकडे ओबीसी जनमोर्चानेही आपल्या विविध मागण्यांसाठी २० जानेवारीलाच आंदोलन पुकारले आहे. या दोन्ही समाजाच्या आंदोलनाची तयारी सध्या मुंबईत जोरदार सुरू असल्याचे चित्र पहायला मिळत आहे. मात्र मुंबईत एकाच वेळी दोन्ही समाज – आमने सामने येऊन संघर्ष पेटण्याची शक्यता आहे.त्यातच धनगर समाजाने २६ जानेवारीपर्यंतची मुदत दिली.या समाजाने पंढरपूरच्या बैठकीत आंदोलनाची दिशा ठरवली नाही पण लवकरच होणाऱ्या दुसऱ्या बैठकीत आंदोलनाचे स्वरूप ठरवले जाणार आहे.त्यामुळे आरक्षणाचा संघर्ष भलताच चिघळण्याची चिन्हे दिसत आहेत.

## 'थर्टी फर्स्ट'ला होणारे गैरप्रकार टाळण्यासाठी ८१२ अधिकारी तैनात

सुराज्य/सोलापूर

कॅलेंडर वर्षाचा शेवटचा दिवस अर्थातच डिसेंबर, थर्टी फर्स्ट...! ३१ डिसेंबरच्या मध्यरात्री १२ वा.नंतर सन २०२४ हे नवीन वर्षास सुरूवात होणार आहे. त्यानिमित्त रात्रीचे वेळी लोक विशेषतः तरुण-तरूणी मोठ्या प्रमाणात सहभागी होऊन नूतन वर्षाच्या स्वागत कार्यक्रमाचे आयोजन करतात. अशावेळी शहरात अपघात अथवा कोणताही अनुचित प्रकार घडून सार्वजनिक शांततेला गालबोट लागू नये, यासाठी पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत चोख बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे.

### असा आहे 'थर्टी फर्स्ट' चा बंदोबस्त!

पोलीस आयुक्तालय सोलापूर शहर यांच्याकडून शनिवारी, ३१ डिसेंबर रोजी लावण्यात आलेला बंदोबस्त पुढीलप्रमाणे आहे. पोलीस उप आयुक्त ०३, सहाय्यक पोलिस आयुक्त ०६, पोलीस निरीक्षक २२, सपोनि/ पोसई ४६ आणि पोलिस अंमलदार ७३५, एकूण ८१२.





त्यात ३ पोलीस उप आयुक्त, ६ सहाय्यक पोलिस आयुक्त, २२ पोलीस निरीक्षक, ४६ सपोनि/पोसई आणि ७३५ पोलिस अंमलदार असा एकूण ८१२ अधिकारी-कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात आली असल्याची माहिती पोलीस आयुक्तालयाच्या वतीने पोलीस उपायुक्त डॉ.दिपाली काळे यांनी एका प्रसिद्धी पत्रकान्वये दिली.

नववर्षाचे स्वागत करण्याच्या उत्साहात तरूण मुले-मुली रस्त्यावर रात्रीच्या वेळी पायी,मोटार वाहनावर फिरतात. नव वर्षे स्वागत करणारे अति उत्साही लोकांमुळे व वेगाने वाहन चालविणारे लोकांकडून अपघात होऊ शकतात, तसेच दारू पिऊन गाडी चालवू नये, ट्रीपल सिट घेऊन आरडाओरडा करत मोटार सायकल चालवू नये, ध्वनी प्रदुषण होईल,असे कृत्य कोणी करू नये, मोटार सायकलचे सायलेन्सर काढून गाडी कोणीही चालवू नये, महिलांची छेडछाड करणारे कृत्य कोणी करू नये,बिभत्स वर्तन कोणी करणार नाही, असे करताना आढळून आल्यास पोलीस प्रशासन संबधितावर योग्य ती कारवाई करेल, असंही पोलीस उपायुक्त डॉ.दिपाली काळे यांनी म्हटलं आहे. पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत सोलापूर शहरात ७० स्टॅटिक पॉईट, १३ ठिकाणी नाकाबंदी व बॅरिकेट लावली आहे.

शहरात छत्रपती शिवाजी महाराज चौक,भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक (पार्क), सात रस्ता, नई जिंदगी, या ठिकाणी स्ट्रायकिंग फोर्स व दंगा नियंत्रण पथक नेमण्यात आले आहेत.

## लग्नाचे आमिष दाखवून महिलेवर अत्याचार

सोलापूर : कायदेशीर लग्न करुन पत्नीप्रमाणे सांभाळण्याचे आमिष दाखवून आपल्यावर गेल्या सात वर्षांपासून अत्याचार केला आणि लग्नास नकार दिल्याची तक्रार ४६ वर्षीय महिलेने दिल्याने संशयित आरोपीविरुद्ध गुन्हा नोंदला आहे.हा प्रकार १९ ऑगस्ट २०१६ ते १६ मार्च २०२३ या काळात वेळोवेळी झाल्याचे फिर्यादिने म्हटले आहे.

श्रीकांत आडम (रा.४०३/४, जोडभावी पेठ, सोलापूर) असे गुन्हा नोंदलेल्या व्यक्तिचे नाव आहे. फिर्यादित पिडितेने म्हटले आहे की, यातील पिडित महिला सोलापूर शहरातील एका परिसरात ४६ वर्षीय महिला



भाडयाने वास्तव्यास आहे. यातून आरोपीने तिला कायदेशीर लग्न करतो, पत्नीप्रमाणे सांभाळतो असे आमिष दाखवून तिच्याशी सलगी केली. वेळोवेळी लग्नाबद्दल विचारणा करुनही टाळाटाळ करण्यात आली.२०१६ पासून मार्च २०१३ पर्यंत हा प्रकार सुरु होता. अखेर आपली फसवणूक होत असल्याचे लक्षात आल्याने पिडितने एमआयडीसी पोलीस ठाण्यात तक्रार दिली. त्यानुसार गुन्हा नोंदला असून, तपास सपोनि साळुंखे करीत आहेत.

## भूमापन कार्यालयात तीन हजारांची लाच घेताना एकजण एसीबीच्या जाळ्यात

सोलापूर : येथील नगर भूमापन कार्यालयातील प्रलंबित काम करून देण्यासाठी तीन हजार रुपयांची लाच स्वीकारल्याप्रकरणी सोलापूर लाच लचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने खाजगी इसमास रंगेहात पकडले. अ.रऊफ म.शरीफ शेख (रा.३९६,न्यू पाच्छा पेठ, लालबहादूर शास्त्री हायस्कूलजवळ) असे त्याचं नाव असल्याचे सांगण्यात आले.



या प्रकरणातील तक्रारदाराच्या वडिलांचे निधन झाल्यावर तक्रारदार त्याची आई, भाऊ-बहीण यांची वारस नोंद करण्यासाठी नगर भूमापन कार्यालयाकडे अर्ज केला होता. तक्रारदार त्या अर्जाचा पाठपुरावा करीत असताना त्याची अ.रऊफ म.शरीफ शेख याच्याशी भेट झाली.त्याने ते प्रलंबित काम करून देण्यासाठी तक्रारदाराकडे ३ हजार रुपयांची लाच मागितली. त्या तक्रारीची पडताळणी करून पोलीस उपअधीक्षक (लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सोलापूर) गणेश कुंभार यांनी पडताळणी करून शुक्रवारी सापळा रचला होता. खाजगी इसम अ.रऊफ म.शरीफ शेख याला तक्रारदाराकडून ३ हजार रुपयांची लाच स्वीकारताना इनामदार हॉटेलसमोरील रस्त्यावर रंगेहात पकडण्यात आले.तो त्या कार्यालयात एजंट म्हणून काम करीत होता, असे तक्रारदाराचे म्हणणे आहे. एसीबीच्या पथकाने रंगेहात पकडल्यावर त्यास ताब्यात घेतले. ही कामगिरी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणेचे पोलीस अधीक्षक अमोल तांबे, अपर पोलीस अधीक्षक डॉ.शीतल जानवे-खराडे यांच्या मार्गदर्शनाखाली सोलापूर प्रतिबंधक विभागाचे उपाधीक्षक गणेश कुंभार, पोलिस अंमलदार हवालदार शिरीषकुमार सोनवणे, पोलीस नाईक श्रीराम घुगे, पोलीस कॉन्स्टेबल रवी हाटखिळे, चालक शाम सुरवसे यांनी पार पाडली.

## शरद पवार, राज आणि उद्धव ठाकरेंना राम मंदिर कार्यक्रमाचे निमंत्रण

मुंबई : अयोध्येच्या कार्यक्रमासाठी शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे, राष्ट्रवादीचे अध्यक्ष अध्यक्ष शरद पवार आणि मनसे अध्यक्ष राज ठाकरेयांना निमंत्रण पाठवलं जाणार आहे. याशिवाय वंचितचे प्रकाश आंबेडकर आणि केंद्री मंत्री रामदास आठवले यांनाही या कार्यक्रमाचे निमंत्रण पाठवलं जाणार आहे. राम जन्मभूमी न्यासाने ज्या निमंत्रण पत्रिका कुरिअर केल्या आहेत त्यामध्ये या सर्व नेत्यांनी नावं आहेत.

येत्या २२ जानेवारी रोजी अयोध्येत श्री राम जन्मभूमीच्या ठिकाणी प्रतिष्ठापना कार्यक्रम होणार आहे. त्यासाठी देशातल्या



सर्व प्रमुख राजकीय नेत्यांना निमंत्रणं दिली जाणार आहेत. यामध्ये आता शरद पवार, उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे तसेच प्रकाश आंबेडकर, रामदास आठवले या महाराष्ट्रातील नेत्यांना निमंत्रण पाठवलं गेल्याची माहिती आहे. राम जन्मभूमीच्या सोहळ्याच्या कार्यक्रमाचे निमंत्रण उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांना देण्यात आलं नसल्याच्या बातम्या आल्या होत्या.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



या 'गाडीत' एवढेच सीट आहेत, जास्त नाही जाणार !


कल्याण
690-54-347

मुंबई
166-34-112


## संत दामाजी संस्थेतील कर्मचाऱ्यांची उपासमार

सुराज्य/पंढरपूर

**श्री विद्या विकास मंडळ संचलित श्री संत दामाजी महाविद्यालय या संस्थेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव हे गुन्हा दाखल झाल्यापासून दिसत नाहीत. गेल्या अडीच महिने त्यांनी महाविद्यालयात पाऊल ठेवले नाही. दरम्यान पगार न झाल्याने संस्थेतील कर्मचाऱ्यांची उपासमार होत आहे.**



दरम्यान महाविद्यालयांमध्ये विना अनुदानित तत्वावर शास्त्र महाविद्यालय चालवले जाते. याशिवाय इतर विनाअनुदानित कोर्सेस चालवले जात आहेत. या ठिकाणी काम करणारे प्राध्यापक, सहशिक्षक, लिपिक, शिपाई या सर्वांचे गेली तीन महिने झाले पगार झाले नाहीत प्रशासनाधिकाऱ्यांनी पगार केले नसल्यामुळे या कर्मचाऱ्यांवर व त्यांच्या कुटुंबीयांवर उपासमारीची वेळ आली आहे. त्यांचे पगार तत्काळ करण्यात यावेत अशी मागणी संस्थेचे राहिलेले एकमेव सचिव ॲड. रमेश जोशी यांनी केली आहे.

संस्थेचे सचिव रमेश जोशी व संचालक डॉ. अशोक सुरवसे यांच्या बोगस सह्या करून धर्मादाय आयुक्त कार्यालय सोलापूर यांच्याकडे बदल अहवाल सादर करण्यात आला. यामुळे मंगळवेढा पोलीस ठाण्यात रमेश जोशी व अशोक सुरवसे यांनी फिर्याद दाखल केली होती यामध्ये राहुल शहा, बाबासाहेब पाटील यांना तात्पुरता जामीन न्यायालयाने दिलेला आहे मात्र न्यायालयीन वाद पोलीस कोर्टकचेरी यामध्ये विनाअनुदानित असलेल्या प्राध्यापक कर्मचारी यांचे वेतन विनाकारण अडवून ठेवण्यात आले आहे यामुळे कर्मचारी व शिक्षक वर्गातून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. प्राध्यापकांची सुटा संघटना याबाबत मूग गिळून गप्प आहे. सुमारे दहा ते पंधरा वर्षांपूर्वी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित दलित मित्र कदम गुरुजी शास्त्र व कला महाविद्यालय या ठिकाणी प्राध्यापकांचे व कर्मचाऱ्यांचे पगार झाले नाहीत म्हणून सुटा संघटनेच्या वतीने ३२ दिवस महाविद्यालयाच्या दारात धरणे आंदोलन केले होते मात्र ही आंदोलन करणारी सुटा संघटना दामाजी महाविद्यालयातील प्राध्यापकांच्या पगारासाठी मूग गिळून गप्प बसली आहे.

एकेकाळी प्राध्यापकांच्या पगारासाठी वेतनासाठी संस्थेला वेठीस धरणारे सांगली, कोल्हापूर, सोलापूर या भागात सुटा संघटनेच्या माध्यमातून भीती निर्माण करणारे नेते आता प्राचार्य प्राध्यापक सोलापूर विद्यापीठात व्यवस्थापन समितीवर सदस्य झाले असल्यामुळे प्रशासक म्हणून कार्यरत असल्यामुळे प्राध्यापकांवर होणाऱ्या अन्याबाबत दुटप्पी भूमिका घेत असल्यामुळे त्यांच्याबद्दल उलट सुलट चर्चा होत आहे. त्यांच्या हेतूबद्दल शंका घेतली जात आहे.

## अमृत नाटेकर यांनी घेतला महसूल उपजिल्हाधिकारी पदाचा पदभार

सोलापूर : राज्यशिष्टचार विभागाचे उपजिल्हाधिकारी अमृत नाटेकर यांची सोलापूर महसुल विभागाचे उपजिल्हाधिकारी म्हणून नियुक्ती झाली आहे. सोलापूरात येवून आपल्या पदाचा पदभार घेतला.

विठ्ठल उमदले यांच्याकडे महसुल उपजिल्हाधिकारी आणि दक्षिणचे विभागिय आधिकारी असे दोन पदभार होता. शासनाने काही अधिकाऱ्यांच्या बदल्या केल्या आहेत. त्यामध्ये अमृत नाटेकर यांचा समावेश आहे. त्यांना सोलापूर महसुल विभागाचे उपजिल्हाधिकारी म्हणून नियुक्ती झाली आहे. त्यांनी शुक्रवारी सोलापूरात येताच आपल्या पदाचा पदभार घेतला आहे. नाटेकर यांनी राज्यशिष्टाचार विभागाचे उपजिल्हाधिकारी म्हणून साडेतीन वर्ष काम केले आहे. यापुर्वी त्यांनी सोलापूरात २००९ मध्ये भुसंपदान अधिकारी म्हणून चांगले काम केले आहे.